# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** कोरेगांव
 **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0060  **Year (वर्ष):** 2024
 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/02/2024 01:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
 1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 20/02/2024
 **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/02/2024
 **Time From (वेळेपासून):** 14:36 बजे
 **Time To (वेळेपर्यंत):** 14:36 बजे

 (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
 **Date (दिनांक ):** 21/02/2024  **Time (वेळ):** 01:10 बजे

 (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
 **Entry No. (नोंद क्र.):** 003
 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/02/2024 01:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
 1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
 पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
 (b) **Address (पत्ता):** उपकार्यकारी अभियंता मराविवि,कोरेगाव

 (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
 **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
 **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): जब्बार निसार खान

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शांतीनगर रहिमतपुर रोड कोरेगां,कोरेगांव,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शांतीनगर रहिमतपुर रोड कोरेगां,कोरेगांव,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मदन रामदास कडाळे | | | 1. यादव कॉलनी,तामजाईनगर, सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपयाच्या 20 नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 20/02/2024

मी,जब्बार निसार खान वय-25 वर्षे,व्यवसाय -इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर रा शांतीनगर रहिमतपुर रोड कोरेगांव ता कोरेगांव.जि.सातारा.मो.नं.8605547867.

मी दिनांक13/02/2024 रोजी दुपारी14.00 वाचे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो सातारा येथे समक्ष हजर राहुन पोलीस उप अधीक्षक श्री राजेश वाघमारे यांची भेट घेवुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व त्यावर श्री वाघमारे साहेब यांनी माझ्या तक्रारीवर पोलस निरीक्षक श्री पवार हे पुढील कारवाई करतील असे सांगितले .त्यानंतर पोनि/पवार यांना माझ्याकडे होणाऱ्या लाच मागणीबाबत थोडक्यात माहिती दिली व मी लिहिलेला तक्रारी अर्ज पोनि/पवार यांचेकडे दिला तेव्हा त्यांनी पुढील कारवाईचे नियोजन थोकड्यात सांगितले व जेव्हा कडाळे साहेब हे कार्यालयात हजर असतील तेव्हा आपलेशी संपर्क करतील तेव्हा आपण माझ्या तक्रारीनुसार कोरेगाव येथे येवुन कारवाई करण्याची विनंती केली.

त्या नियोजनानुसार मी दिनांक 15/02/2024 रोजी पो.नि पवार यांना फोनवरुन संपर्क करुन कळविले की, आज कडाळे साहेब हे कार्यालयात हजर आहेत.आपण पुढील कायदेशीर कारवाई करावी त्याप्रमाणे पो.नि पवार हे दोन्ही पंच व सापळा पथक यांचेसह दुपारी 15.00 वाचे सुमारास कोरेगांव येथील रेल्वे स्टेशन जवळ येवुन पोहोचले. तेव्हा पो.नि पवार यांनी माझी ओळख करुन घेवुन त्याचे सह असणाऱ्या दोन्ही पंचाची व सापळा पथकाची एकमेकास ओळख करुन दिली .तेव्हा मी त्यांना श्री कुणाल शशीकांत जाधव रा कोरेगांव यांचे इलेक्ट्रीक पोल व नवीन विज कनेक्शनचे काम घेतले असुन सदर काम मंजुरी मिळाल्यानंतर महावितरण कार्यालयातील उपकार्यकारी अभियंता कडाळे साहेब यांना भेटली असता असता त्यांनी सात पोलची वर्क आर्डर मंजुर झाली असुन प्रत्येक पोल प्रमाणे एक हजार असे सात हजार रुपये लाचेची मागणी केली .तेव्हा मी त्यांना पाच हजार रुपये दिले असुन उर्वरित दोन हजार रुपये मागणी करीत आहेत तसेच प्रकाश प्रेमसिंग राठोड रा.कोरेगांव व हणमंत निवृती कदम रा जायगाव ता कोरेगांव यांचे नवीन विज कनेक्शन मिळवुन देण्याकामी व पोल टाकणे कामी नऊ हजार रुपये असे एकुण 11,000/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबतची तक्रार पंचासमक्ष पो.नि पवार यांना पुन्हा सांगितली .तेव्हा पोनि पवार यांनी पंचांना ती वाचुन दाखविली.व त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या .दिनांक 15/02/2024 रोजी कडाळे साहेब हे कार्यालयात हजर नसल्याचे व अचानक मिटींग करिता सातारा येथे गेल्याचे मला समजले त्यामुळे पडताळणी कारवाई करता आली नाही. त्यानंतर पुढील कारवाई दिनांक 20/02/2024 रोजी करण्याचे नियोजन करण्यात आले व मला पंचांना तसेच सापळा पथकास गोपनीयतेच्या सुचना देवुन घरी जाणेस सांगितले.

मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक 20/02/2024 रोजी रेल्वे स्टेशन कोरेगांव येथे हजर असताना पो. नि पवार हे पंच व सापळा पथक यांचेसह रेल्वे स्टेशन ,कोरेगांव येथे 12.00 वाचे सुमारास येवुन पोहोचले तेव्हा पो नि पवार यांनी मला व पंच नं 1श्री गोडले यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन प्रक्रिया समजावुन सांगितली व माझ्या शर्टचे आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन लावुन दिले व तेथुन 13.17 वाचे सुमारास मी व पंच नंबर 1 गोडसे असे माझ्या मोटार सायकल क्रमांक एमएच 11 डीजे 9984 वरुन उपकार्यकारी अभियंता , महावितरण कार्यालय कोरेगांव येथे कडाळ साहेब यांची भेट घेणे कामी रवाना झालो.त्यावेळी पो.नि पवार व सापळा पथक त्यांचे वाहनात तिथेच थांबुन राहिले होते.

मी व पंच असे उपकार्यकारी अभियंता ,महावितरण कार्यालय,कोरेगांव येथे पोहाचलो त्यावेळी कडाळे साहेब हे त्यांचे केबीनमध्ये बसलेले होते.आम्ही कामासंदर्भाने बोलणी केली या बोलणी दरम्यान मी पहिले पाच हाजार दिले होते असे म्हणालो त्यावेळी कडाळे सांहेब यांनी ,बर,ह्याचं किती, पाच देवुन टाका, मागचे आणि पुढचं क्लिअर करुन टाक, काय राहिल ते तुझ्या हिशोबानं दे, असे म्हणाले तेव्हा मी त्यांना मागचेपाच दिले होते,2 राहिले होते.असे म्हणालो, त्यावर कडाळे साहेब पाठीमागचे दोन आणि आताचे किती झाले ते दोन आहेत असे म्हणुन पाच दिलं तरी चालेल असे म्हणाले व पुर्वीच्या कामाचे व नवीन कामाचे असे एकुण 11 हजार द्यावे लागतील असे म्हणाले .तेव्हा मी

त्यांना सर 10 घ्या की,राऊंड फिगर असे म्हणालो.तेव्हा कडाळे साहेब यांनी ठिक आहे असे म्हणुन तडजोडीअंती 10,000/- रु लाचेची मागणी केली .व लागलीच लाच रक्कम घेवुन येण्यास सांगितली.

त्यानंतर मी व पंच नं1 श्री गोडसे असे परत पो.नि .पवार व त्यांचे सहकारी थांबले ठिकाणी 13.40 वाचे सुमारास आलो.व मी .पो.नि पवार यांना घडलेली हकीकत सांगितली व पो.नि पवार व पंचानी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुन खात्री करुन घेतली.उपकार्यकारी अभियंता ,अभियंता ,महावितरण कार्यालय,कोरेगांव येथील कडाळे साहेब हे 10,000/- रु लाचेची मागणी करत असल्याची माझी, पो.नि पवार व पंचाची खात्री झाल्याने व लाच रक्कम लागलीच स्विकारण्याची त्यांनी तयारी दर्शविल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय पो.नि पवार व पंचानी घेतला.

त्यानुसार लागलीच पो.नि पवार यांनी मला व पंचाना सापळा कारवाईची माहिती थोडक्यात समजावुन सांगितली व वेळेच्या अभावी पडताळणी पंचनामा तसेच संभाषण स्क्रिप्ट नंतर टाईप करण्यात येईल असे सांगितले.त्यानंतर मी पो.नि पवार यांचे सागंणेवरुन माझ्याकडे असलेली 10,000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली त्यानुसार पो.नि पवार यांचे सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेल्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेतले.पो.नि पवार यांनी अँथ्रासिन पावरडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगुन सापळापुर्व व सापळा कारवाईची माहीत सांगितली व त्यानुसार त्यांचे सहकार्यानी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली व अंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझ्या अंगावरील शर्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवली आणि कडाळे साहेब यांना लाचेची रक्कम दिल्या नंतर डाव्या हाताने डोक्यावरुन तीनदा हात फिरवुन इशारा करण्याच्या सुचना पो.नि पवार यांनी मला दिल्या.

त्यानंतर पो.नि पवार यांनी माझ्या शर्टचे आतील बाजुस व्हाईट रेकॉर्डर सुरु करुन लावुन दिले.मी व पंच नं 1 गोडसे असे माझ्या मोटार सायकलवरुन उपकार्यकारी अभियंता,महावितरण, कार्यालय, कोरेगांव येथे जाणेकरीता 14.18 वा.चे सुमारास रवाना झालो. उपकार्यकारी अभियंता,महावितरण, कार्यालय, कोरेगांव या कार्यालयात गेलेनंतर कडाळे साहेब यांची त्यांच्या केबीनमध्ये भेट झाली .त्यावेळी कडाळे साहेब यांना मी दहा आणलेत असे सांगितले.तेव्हा कडाळे साहेब यांनी हातातील पेनने खुणावुन पैसे टेबलावर ठेवण्यात सांगितले.त्याप्रमाणे मी लाच रक्कम त्यांचे टेबलावर ठेवले असता त्यांनी ती उजव्या हाताने घेवुन त्यांचे टेबलच्या उजव्या बाजुच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवुन दिली.त्यानंतर मी बाहेर येवुन सापळा पथकास दिलेस असा लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला.तेव्हा पो.नि पवार व सापळा पथाने कडाळे साहेब यांना त्याचे केबीनमध्ये लाचेच्या रक्कमेसह 14.36 वा चे सुमारास ताब्यात घेतले.तसेच माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन पो.नि पवार यांनी त्यांचे ताब्यात घेतला.त्यानंतर पो.नि पवार यांनी पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा येथे करण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सातारा कार्यालय या ठिकाणी सापळा पंचनाम्याची कार्यावाही पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दिनांक 20/02/2024 रोजी लोकसेवक मदन रामदास कडाळे वय 46 वर्षे रा उपकार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या उपविभाग,कोरेगांव वर्ग 02 सध्या रा यादव कॉलनी,तामजाईनगर,सातारा यांनी माझे कामाचे नवीन इलेक्ट्रीक पोल बसविणे ,नवीन विज कनेक्शन मंजूर करणे कामाची वर्क ऑर्डर व कामाचा वर्क कॅप्लीशन रिपोर्ट देण्यासाठी 11,000/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रु लाच रक्कम उपकार्यकारी अभियंता महावितरण,कार्यालय,कोरेगांव येथे स्विकारलेने त्यांनी वैध परिश्रमीशिवाय अन्य पारितोषण ,प्रलोभन, बक्षिस म्हणुन आर्थिक फायदा मिळविला म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक मदन रामदास कडाळे, यांचेशी कसलेही वैयक्तिक वैर नसुन माझा त्याचेशी कसलाही पैशाचा अर्थिक देवाण घेणावीचा व्यवहार नाही.

माझी वरील खबरी जबाब माझे सांगिणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीमध्ये टंकलिखित करण्यात आला असुन तो बरोबर असल्याचा खात्री करुन कमी त्यावर सही केली आहे.

समक्ष हा

जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
DIPAK NAMDEV SHEDGE
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): PCMH84586
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.स्टे.ऑफिसर
करिमाव पो.ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sakharam rakhmaji l
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): api